आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ जून २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीत रेस्टॉरन्टला लागलेल्या आगीत २१ जणांचा मृत्यू,  ४० जण जखमी
- कर्नाटकचे २५ वे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेस नेत डी. के. शिवकुमार आणि उपमुख्यमंत्री म्हणून जी. परमेश्वर आज शपथ घेणार
- पश्चिम बंगालमधे तृणमूल काँग्रेसचे निलंबित आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांचा विरोधी पक्षनेते पदावर दावा
- विवाहित मुलींना अनुकंपा नियुक्तीतून वगळता येणार नाही-सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**आणि**

- ब्रिक्स देशांच्या आपत्ती जोखीम निवारण कार्यगटाची पहिली बैठक ओदिशात पुरी इथं सुरू

<><><><><><>

नवी दिल्लीतल्या मालवीय नगर इथल्या एका रेस्टॉरन्टला लागलेल्या आगीत २१ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमधे बहुतांश आफ्रिका आणि मध्य आशियातल्या नागरिकांचा समावेश आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले असून मदत आणि बचावकार्य सुरू आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे, आगीचं कारण अद्याप समजू शकलं नाही.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री मदत निधीतून प्रत्येकी दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. दिल्लीच्या

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. अग्निशमन दलाचे जवान, पोलीस, तसंच बचाव पथकं घटनास्थळी पोचले असून बचावकार्य सुरू आहे, असं गुप्ता यांनी सांगितलं.

<><><><><>

गुजरातमधे बारडोली इथं काल महाराष्ट्र परिवहन महामंडळाच्या दोन बस एकमेकांना धडकून झालेल्या अपघातातबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले आहेत. बारडोलीतल्या उवा गावात हा अपघात झाला.

या अपघातात मृतांच्या कुटुंबियांप्रती राष्ट्रपती मुर्मू यांनी सहवेदना व्यक्त केली असून अपघातात जखमी लवकर बऱ्या व्हाव्यात अशा सदिच्छा दिल्या आहेत. उपराष्ट्रपती राधाकृष्णन यांनीही मृतांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं. अपघातातल्या मृताच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपयांची, तर जखमींना ५० हजार रुपयांच्या मदत देण्याची घोषणाही प्रधानमंत्र्यांनी केली.

<><><><><>

कर्नाटकचे २५ वे मुख्यमंत्री म्हणून काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते डी. के. शिवकुमार आज बंगळुरू इथे होणाऱ्या सोहळ्यात आज शपथ घेतील. तर डॉक्टर जी. परमेश्वर हे उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासह दहा आमदारांना राज्यपाल थावरचंद गेहलोत मंत्रीपदाची शपथ देणार आहेत.

या सोहळ्याला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, के. सी. वेणुगोपाल उपस्थित राहतील.

<><><><><>

कुटुंबाच्या व्याख्येतून विवाहित मुलींना वगळणं हे अन्यायकारक आणि घटनाबाह्य असून त्यामुळे त्यांना अनुकंपा नियुक्तीतून वगळता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याचा सेवेत असताना मृत्यू झाला किंवा तो वैद्यकीय कारणांमुळे लवकर सेवानिवृत्त झाला तर सरकारतर्फे त्याच्या कुटुंबातल्या सदस्याला नोकरी दिली जाते. त्यानुसार एका मृत व्यापाऱ्याच्या विवाहित मुलीने दाखल केलेल्या याचिकेवर कुटुंबाच्या व्याख्येत विवाहित मुलीचा समावेश होत नाही, असा आदेश अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिला होता. या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर न्यायमूर्ती पी. एस. नरसिंह आणि आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाचा आदेश रद्द केला.

<><><><><><>

पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पक्षात वादंग निर्माण झालं असून,पक्ष फुटीच्या उंबरठ्यावर आहे. पक्षातून हकालपट्टी झालेले आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांनी आज विधानसभा अध्यक्ष  रथिंद्र बोस यांची भेट घेत ५८ आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र त्यांना दिले. या भेटीवेळी ऋतब्रत  यांनी आपली गटनेते पदी तर अखरुझ मान यांची पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून निवड करावी, अशी मागणी केली आहे. तृणमूल काँग्रेसचे विधिमंडळ पक्षाचे नेते शोभनदेब चट्टोपाध्याय यांच्या निवडीला ऋतब्रत बॅनर्जी यांच्यासह ५८ आमदरांनी विरोध केला आहे.

दरम्यान, या बंडखोर आमदारांनी विधासभा अध्यक्षांना दिलेल्या निवेदनात पक्षप्रमुख  ममता बॅनर्जी  यांचा उल्लेख अध्यक्ष असा केला आहे. यामुळे तृणमूल काँग्रेसमधील  सत्तासंघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

<><><><><><>

ब्रिक्स देशांच्या आपत्ती जोखीम निवारण कार्यगटाची पहिली बैठक आज भारताच्या अध्यक्षतेखाली ओदिशात पुरी इथं सुरू होईल. तीन दिवसांच्या या

बैठकीत ब्राझील, रशिया, चीन, दक्षिण आफ्रिका, सौदी अरेबिया, इजिप्त, संयुक्त अरब अमिराती, इथियोपिया, इराण आणि इंडोनेशियासह ११ ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांचे प्रतिनिधी, धोरणकर्ते आणि आपत्ती व्यवस्थापन तज्ञ सहभागी होतील. या बैठकीचा मुख्य उद्देश आपत्ती जोखीम निवारणासाठी शाश्वत वित्तपुरवठा, पायाभूत सुविधांचा विकास, पूर्वतयारी आणि प्रतिसाद यंत्रणा तसंच पारंपरिक आणि आधुनिक आपत्ती व्यवस्थापन पद्धतींचं एकत्रीकरण यावर चर्चा करणं हा आहे.

<><><><><>

वार्षिक सौरउर्जा क्षमता वाढीत अमेरिकेला मागे टाकून भारताने २०२५मध्ये जगातली दुसरी सर्वात मोठी सौर उर्जा बाजारपेठ बनण्याचा मान मिळवला आहे, अशी माहिती केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी दिली. देशाचा सौर उर्जा विकास मजबूत करण्यासाठी धोरणात्मक पाठिंबा, नावीन्य आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांच्या माध्यमातून भारत जागतिक मापदंड प्रस्थापित करत असल्याचं जोशी यावेळी म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीकरता महायुतीच्या १७ उमेवारांची यादी आज जाहीर करण्यात आली. या निवडणुकीत महायुतीच्या घटक पक्षांकडून राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, अरुण लखानी, प्रवीण पोटे, राजेंद्र राऊत, प्राजक्त तनपुरे, नंदकिशोर महाजन, धैर्यशील कदम, अमरनाथ राजूरकर, बसवराज पाटील, सुहास शिरसाठ, रविंद्र फाटक, दुष्यंत चतुर्वेदी, सईद खान, नरेंद्र दराडे, अनिकेत तटकरे, विक्रम काकडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

<><><><><>

पश्चिम आशियात पुन्हा तणाव निर्माण झाला असून त्याचा परिणाम आज पुन्हा एकदा भारतीय शेअर बाजारावर दिसून आला. बाजाराचे कामकाज सकाळी सुरू झाल्यानंतर मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात ७०० अंकांची घसरण झाली,

निर्देशांक ७३ हजार ९५६ अंकांच्या आसपास होता. तर निफ्टीतही १७७ अंकांची घसरण होऊन तो २ हजार ३०२ अंकांच्या आसपास होता.

<><><><><><>

आज जागतिक सायकल दिन आहे. वाहतुकीसाठीचं साधं, परवडणारं, विश्वासार्ह आणि पर्यावरणाला अनुकूल असं वाहन असलेल्या सायकलला मान्यता देण्यासाठी तसंच पर्यावरण संवर्धन आणि आरोग्याला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी ३ जून रोजी सायकल दिन साजरा केला जातो. तुर्कमेनिस्तान सरकारने पुढाकार घेतलेल्या संयुक्त राष्ट्र महासभेच्या ठरावाद्वारे हा दिवस स्वीकारण्यात आला. या दिवसाची यंदाची संकल्पना हरित भविष्यासाठी सायकलिंग अशी आहे. कार्बन उत्सर्जन कमी करणं, वाहतूक कोंडी कमी करणं, शाश्वत आणि निरोगी शहरी वातावरणाला प्रोत्साहन देणं हा या दिवसाचा हेतू आहे.

जागतिक सायकल दिनाच्या निमित्ताने केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी भारतातल्या तरुणांना सायकलिंगचा पर्याय निवडण्याचं आणि त्याच्या माध्यमातून अधिक निरोगी, सुदृढ राहण्याचं आवाहन केलं आहे. तसंच पर्यावरणाची शाश्वतता राखून हरित राष्ट्रासाठीच्या चळवळीचं नेतृत्व आजच्या तरुणांनी करावं, असं आवाहनही मांडवीय यांनी केलं आहे.

<><><><><><>

देशाचं सार्वभौमत्व आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांच्यात संघर्ष निर्माण झाला तर सार्वभौमत्वाला प्राधान्य दिलं जाईल, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. अंमली पदार्थ आणि मनावर परिणाम करणाऱ्या पदार्थांशी संबंधित प्रकरणांमध्ये ही बाब विशेषतः लागू होईल, असंही न्यायालयाने म्हटलं. तुरुंगातून मोबाईल फोनचा वापर करून अंमली पदार्थाच्या तस्करीचं जाळं चालवल्याचा आरोप असलेल्या व्यक्तिचा जामीन मंजूर करणारा पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा आदेशही

सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला आहे. संबंधित व्यक्तिवरचे आरोप लक्षात घेता जामिनावर बाहेर असताना त्याची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असंही न्यायालयाने म्हटलं आहे.

<><><><><><>

राजधानी दिल्लीसह हरियाणा, चंडीगड, पंजाब, मध्यप्रदेश, गुजरात, आंध्रप्रदेश आणि तेलंगणामधे आज मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. केरळ आणि माहे इथं जोरदार पाऊस पडेल. तर महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, हिमाचल प्रदेश इथं मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह आज आणि उद्या पावसाची शक्यता आहे.

//<><><><><><>//